॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

उमवि नगर, जळगाव -४२५ ००१

## जाहीर प्रकटन

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांसाठी शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेल्या बृहत विकास आराखडयास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या एका वर्षाकरीता अद्ययावत केलेल्या वार्षिक बृहत आराखडयामध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०९ मधील तरतूदीच्या अनुषंगाने **शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७** साठी कबचौउमवि अधिक्षेत्रात नवीन महाविद्यालय/परिसंस्था व विस्तारीकरण अंतर्गत अभ्यास पाठ्यक्रम / विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील NCPS या ऑनलाईन प्रणालीची https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ ही लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदरचे प्रस्ताव **दि. ३०/०९/२०२५ किंवा तत्पूर्वी** सादर करावेत. विधी संदर्भातील नवीन अभ्यासक्रम / विद्याशाखा / विषय / नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार कौन्सिल ऑफ इंडीयाचे ना हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संस्था / महाविद्यालय यांचे प्रस्ताव म.सा.वि.अ.२०१६ च्या कलम १०९ (४)(ग) नुसार स्वीकारण्यात येतील.

तसेच खाजगी कौशल्य प्रदाता परीसंस्था (Skill Knowledge Provider) सुरु करणेसाठी आणि AICTE, PCI आणि NCTE यांच्याशी संबधित विस्तारांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापीठाच्या https://onlinekbcnmu.org.in या संकेतस्थळावर प्रस्ताव **दिनांक ३०/०९/२०२५ किंवा तत्पूर्वी** अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करणेसाठी विद्यापीठातर्फे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज **ऑनलाईन पध्दतीने योग्य त्या शुल्कासह** सादर करण्यासाठी विस्तृत स्वरुपातील माहिती विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर Affiliation Section वर उपलब्ध आहे.

खाजगी कौशल्य प्रदाता परीसंस्था (Skill Knowledge Provider) सुरु करणेसाठी आणि AICTE, PCI आणि NCTE यांच्याशी संबधित विस्तारांचे अपूर्ण भरलेले, अपूर्ण दस्तऐवज असलेले प्रस्ताव तसेच साक्षांकीत कागदपत्र नसलेले व मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

ठिकाण:-जळगांव
दिनांक:- २०/०९/२०२५

**(डॉ. विनोद प्र. पाटील)**
**कुलसचिव**



**संलग्नता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/५/नवीन महा.प्रस्ताव-२०२६-२७/ २८६ /२०२५ दि. २०/०९/२०२५

# परिपत्रक (अत्यंत महत्वाचे)

**नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी इच्छुक असलेल्या विविध शैक्षणिक संस्था**
**आणि**
**विस्ताराचे (Extension) प्रस्ताव सादर करण्यासाठी इच्छुक असलेल्या विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरीता**

**प्रति,**
**विविध शैक्षणिक संस्थाचे मा.अध्यक्ष / संचालक मंडळ आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/ मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा.संचालक यांना -**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय/परिसंस्था तसेच खाजगी कौशल्य प्रदाता संस्था (Skill Knowledge Provider) सुरु करणेसाठी शासनाचे इरादापत्र मागविणेकरीता तसेच अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, विषय, अतिरीक्त तुकडी, सॅटेलाईट केंद्र इत्यादि सुरु करणेसाठी विस्ताराचे प्रस्ताव/अर्ज सादर करणेबाबत..

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/ई-८४०७८३/मशि-४, दि.१८ सप्टेंबर, २०२५
२) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र.एनजीसी-२०२५/ ई-१३१९८७८ /मशि-४, दि. १८ सप्टेंबर, २०२५
३) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. एनजीसी-२०२०/ (११५/२०) मशि-४, दि.१८ सप्टेंबर,२०२० (नवीन सॅटेलाईट केंद्रासाठी)
४) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र जा.क्र.संकिर्ण-२०२५/ई- १३१७१५३ / विशि-५, दि. १९ सप्टेंबर, २०२५

**महोदय/महोदया,**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ चे कलम १०७, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३,११४ व ११६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार आणि संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने तसेच विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षासाठी शास्त्रोक्त पध्दतीने तयार केलेल्या बृहत विकास आराखडयास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता तयार केलेला वार्षिक बृहत आराखडा यास महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (MAHED) नियुक्त तज्ञ समितीच्या शिफारशी तसेच MAHED च्या दि.१० सप्टेंबर, २०२५ रोजीच्या सभेत दिलेल्या मंजूरीस अधिन राहून तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकषांसंदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेशाच्या अधिन राहून सन २०२६ -२७ या शैक्षणिक वर्षासाठी उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा

**(कृ.मा.प.)**

परिसंस्था सुरु करण्यासाठी शासनाचे इरादा पत्र मागविणेकरीता तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ नुसार संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये सुरु करावयाच्या नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, अतिरीक्त तुकडी, सॅटेलाईट केंद्र इत्यांदिंसाठी विस्ताराचे प्रस्ताव / अर्ज मागविण्यात येत आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये तसेच नवीन मान्यतांसाठी आवश्यक निकषां संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या आदेशांमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार आणि महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम २०१६ च्या तरतुदींनुसार उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांनी तयार केलेल्या नमूद लिंक मध्ये प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त अर्जांवर विद्यापीठाव्दारे योग्य ती कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव /अर्ज विद्यापीठाच्या शिफारशींसह शासनाकडे मान्यतेसंदर्भात पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येतील. **तसेच शासनास ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावाची एक प्रत मिनी बॉक्स फाईलमध्ये विद्यापीठास सादर करावी.**

त्याचप्रमाणे खाजगी कौशल्य प्रदाता संस्था (Skill Knowledge Provider) सुरु करणेसाठी आणि AICTE, PCI आणि NCTE यांच्याशी संबधित विस्तारांचे अभ्यासक्रमांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येत नसल्यामुळे विद्यापीठाच्या http://onlinekbcnmu.org.in या संकेतस्थळावर Homepage वर असलेल्या Affiliation Section या Link वरच प्रस्ताव सादर करुन **प्रस्तावाची एक प्रत मिनी बॉक्स फाईलमध्ये विद्यापीठास सादर करावी.**

विद्यापीठाकडे सादर करावयाच्या प्रस्तावासाठी खालील संपर्क क्रमांकावर अथवा संलग्नता विभाग, कबचौउमवि, जळगाव येथे संपर्क साधावा.

- नवीन महाविद्यालय आणि विस्तारांचे प्रस्ताव योग्य त्या शुल्कासह शासनाकडे दि.३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत सादर करणे बंधनकारक आहे.
- खाजगी कौशल्य प्रदाता संस्था (Skill Knowledge Provider) सुरु करणेसाठी आणि AICTE, PCI आणि NCTE यांच्याशी संबधित विस्तारांचे अभ्यासक्रमांचे योग्य त्या शुल्कासह प्रस्ताव दि.३०/०९/२०२५, वेळ सायंकाळी ०५.०० पर्यंत विद्यापीठात सादर करणे बंधनकारक आहे.

- **अधिक माहितीसाठी खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.**

१. श्रीमती सविता प्र.सोनकांबळे, उपकुलसचिव - ९८५०१३२५१३
२. श्री. अनिल रा. वाणी, सहा.कुलसचिव - ९४२२७९३०६४
३. श्री. राजेश म. बागुल, कक्ष अधिकारी - ९४२२७७२८५६

**SD//--**
**(डॉ.विनोद प्र. पाटील)**
**कुलसचिव**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-**
मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.